# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१३/०७/२०२२

**प्रेसनोट**

दिनांक १३ जुलै, २०२२ रोजी सकाळी ०६.५५ वाजता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वाघराळपाडा, रामेश्वर आश्रमाच्या जवळ, राजावली, नायगांव (पूर्व) येथील बैठ्या चाळीतील एका खोलीवर अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्याची दुर्दैवी घटना घडली. दरड कोसळल्यामुळे सदर खोलीत राहणाऱ्या कुटुंबातील ४ व्यक्ती माती-दगडाच्या ढिगाऱ्याखाली अडकले गेले होते. सदर घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेचे अग्निशमन दल, एनडीआरएफ चे पथक व स्थानिक पोलीस दल यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरु केले.

महानगरपालिका अग्निशमन दल, एनडीआरएफ चे जवान, पोलीस दल तसेच स्थानिक ग्रामस्थ यांचे मदतीने दरड कोसळलेल्या ठिकाणी माती व दगडी बाजूला करून चारही व्यक्तींना बाहेर काढण्यात आले. यापैकी १.श्रीम.वंदना सिंग (वय ३४ वर्षे ) व २.कु.ओम सिंग, (वय ९ वर्षे) यांना वाचवण्यात यश आले असून त्यांच्यावर आयएसीस हॉस्पिटल,वसई(पूर्व) या खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांचे प्रकृतीस असलेला धोका टळलेला आहे. मात्र १.अमित सिंग (वय- ४० वर्षे) व २.रोशनी सिंग (वय- १५ वर्षे) हे या दुर्घटनेत मयत झालेले आहेत. सदर व्यक्तींच्या नातेवाईकांशी वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनामार्फत संपर्क करण्यात आलेला आहे.

तसेच घटना घडलेल्या परिसरातील इतर रहिवाशांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली असून त्यांच्या राहण्याची, जेवणाची व वाहतुकीची व्यवस्था वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करणेत आलेली आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**